// सा विद्या या विमुक्तये //
# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
''ज्ञानतीर्थ'' परिसर, विष्णूपुरी, नांदेड–४३१ ६०६ (महाराष्ट्र)
**SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED**
**"Dnyanteeerth", Vishnupuri, Nanded – 431606 (Maharashtra)**
Establishment on 17th September 1994 -Recognized by the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with 'B++' Grade

## ACADEMIC (AFFILIATION) SECTION

Phone : (02462) 229242/43
Fax : (02462) 229245 / 229325
Website : srtmun.ac.in
e-mail :- affiliation@srtmun.ac.in

**शैक्षणिक वर्ष २०२३–२४ करिता विविध अभ्यासक्रमांना अतिरिक्त प्रवेश वाढ देणे बाबत.**

## :: तातडीचे परिपत्रक ::

**संदर्भ :– मा. विद्यापरिषद बैठक क्रं. ५६ विषय क्रं. १०/५६–२०२३, दि. १६.०६.२०२३.**

प्रस्तुत विद्यापीठाशी संलग्नीत सर्व पारंपारीक अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयांचे प्राचार्य यांना कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२३–२४ करिता विविध अभ्यासक्रमांना अतिरिक्त प्रवेश वाढ प्रदान करणे बाबत दि. १६/०६/२०२३ रोजी संपन्न झालेल्या मा. विद्यापरिषद बैठक क्रं. ५६ विषय क्रं. १०/५६–२०२३ अन्वये खालील प्रमाणे ठराव पारीत झालेला आहे.

१. विद्यार्थ्यांची अतिरिक्त प्रवेशवाढीची संख्या ही प्रत्येक तुकडीसाठी असेल.

२. अतिरिक्त प्रवेशवाढ देत असतांना संबधित शहरातील इतर महाविद्यालयांच्या प्रवेशावर परिणाम होणार नाही याची दक्षता घ्यावी.

३. अतिरिक्त प्रवेशवाढ देत असतांना संबधित महाविद्यालयाचे नॅक ॲक्रीडेशन, महाविद्यालयातील भौतिक व शैक्षणिक सुविधा, महाविद्यालयातील शिक्षकांची संख्या व त्यांचा परीक्षेतील सहभाग इत्यादी बाबी विचारात घेवून विद्यापीठाने निश्चित केलेले शुल्क आकारुन अतिरिक्त प्रवेश वाढीस परवानगी देण्यात यावी.

४. महाविद्यालयातील शिक्षकांनी मुल्यांकन प्रक्रियेमध्ये भाग घेतल्याचा आढावा घेवूनच वाढीव संख्या देण्यात यावी.

५. महाविद्यालयातील Institutional Development Plan and ABC नोंदणीचा अहवाल सादर करावा, असे सर्वानुमते ठरले.

६. वरील अटींची (०१ ते ०५) पुर्तता करणा–या महाविद्यालयांसाठी

अ) शैक्षणिक वर्ष २०२३–२४ करीता ज्या अभ्यासक्रमांच्या तुकडीची प्रवेश क्षमता १२० आहे त्या अभ्यासक्रमास १५ टक्के वाढीव प्रवेश देण्यात यावेत. कोणत्याही परिस्थीतीत एका तुकडीमध्ये १४० पेक्षा अधिक विद्यार्थी संख्या होणार नाही याची दक्षता घ्यावी.

ब) ज्या अभ्यासक्रमांच्या तुकडीची प्रवेश क्षमता १०० किंवा कमी आहे त्या अभ्यासक्रमास २० टक्के वाढ करण्यात यावी.

क) पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी विद्यार्थ्यांची मागणी आणि परिसरातील महाविद्यालयातील प्रवेश स्थिती पाहून ३० टक्क्यापर्यंत अतिरिक्त प्रवेशवाढ देण्यात यावी, असे सर्वानुमते ठरले.

वरील ठरावाच्या अनुषंगाने अतिरिक्त प्रवेशवाढीची मागणी करणा–या महाविद्यालयांनी उपरोक्त प्रमाणे माहिती सादर करण्यात यावी जेणे करुन अतिरिक्त प्रवेशवाढी बाबत पुढील कार्यवाही करता येईल याची नोंद घ्यावी.

सदर परिपत्रक हे विद्यापीठाच्या www.srtmu.ac.in या संकेतस्थळावर affiliation या शिर्षकांतर्गत प्रसिध्द करण्यात येत आहे.

''ज्ञानतीर्थ'', परिसर,
विष्णूपुरी, नांदेड–४३१ ६०६
जा.क्र.शैक्षणिक/संलग्न–०३/२०२३–२०२४/106
दिनांक :– २४.०६.२०२३

उपकुलसचिव
शैक्षणिक (संलग्नीकरण) विभाग

प्रत :–
१. मा. प्राचार्य, सर्व संलग्नीत पारंपारीक महाविद्यालये, प्रस्तुत विद्यापीठ.
२. सिस्टीम एक्सपर्ट, शैक्षणिक (संलग्नीकरण) विभाग, प्रस्तुत विद्यापीठ यांना देऊन कळविण्यात येते की, सदर परिपत्रक विद्यापीठ संकेतस्थळावर Affiliation या शिर्षकांतर्गत प्रसिध्द करावे.